PUNE RESEARCH TIMES (ISSN 2456-0960)
AN INTERNATIONAL JOURNAL OF CONTEMPORARY STUDIES SPECIAL ISSUE OCT 2018

# साहित्यातील लिंगभाव आणी स्त्रीवादी जाणिवा

**प्रा. डॉ. दादासाहेब गिऱ्हे**
(मराठी विभाग)
राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालय,
जालना. **महाराष्ट्र भारत**

## प्रस्तावना :

एकाणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धामध्ये स्त्रियांना शिक्षण दैऊन स्वावलंबी केले पाहीजे असा विचार मांडण्यास सुरुवात झाली. रुढी आणि परंपरा, अन्याय, अत्याचाराला आळा घालण्यात यावा म्हणून प्रत्यक्षात काही समाजसुधारकांनी स्त्रियांना शिक्षण देण्यास सुरुवात केली. भारतात पितृसत्ताक पध्दती असल्यामुळे विवाहानंतर मुलगी मूळ कुटुंबातून पतीच्या घरी जाते संसारात रमते, घरदार सांभाळते, मुला बाळांना वाढविते त्यामुळे स्त्रियांचे कार्यक्षेत्र चूल आणि मूल एवढयापुरतेच मर्यादित होते. समाजसुधारकांच्या कार्यामुळे स्त्रियांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध झाल्या. 1960 नंतर विविध वाङ्मय प्रकार उदयास आला यामध्ये स्त्रीवादी परिप्रेक्ष्याच्या अवलंब करुन साहित्याचे विश्लेषण करण्याचे प्रमाण मराठीत वाढताना दिसत आहे.

स्त्रीवादी भूमिकेचा राजकीय, सामाजिक आणि वाङ्मयीन क्षेत्रात प्रभाव वाढत आहे. काही संस्था, संघटना नियतकालिके, पुस्तके, परिसंवाद, मेळावे, याद्वारे स्त्रीमुक्ती स्त्रीवादी या संदर्भात विचार प्रतिपादन केले जात आहे. याचा विचारही या स्त्रीवादी साहित्यात आहे.

वाङ्मयीन व्यवहारात आणि विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात स्त्रीवादी भूमिकेने स्थान मिळवायला प्रारंभ केलेला आहे. अभ्यासक विविध प्रकारे स्त्रीवादी परिप्रेक्षातून शोध घ्यायला कार्यरत आहेत. उदा. मराठीतील स्त्रियांचे कविता लेखन कथा, कादंबऱ्या आत्मचरित्रे या साहित्याची दखल अधिक आस्थेने घेण्याची प्रवृत्ती वाढत आहे. पुरुषांच्या साहित्यातून

लैंगिक भेदभावांचे चित्रण ज्या प्रकारे केले जाते पुरुष केंद्री विचार चौकटीतून स्त्रियांकडे जसे पाहिले जाते त्याचा शोध नव्याने स्त्रीवादी साहित्यात घेतला जात आहे.

स्त्रीवादाने परंपरागत, सांकेतिक जीवन संपूर्ण नाकारुन नव्या जीवन विचार मुल्यांची अपेक्षा केली आहे. पुरुष प्रधान संस्कृतीचे वर्चस्व नाकारुन स्त्री–पुरुष समतेच्या दृष्टीने घेतलेला 'स्व' त्वाचा शोध हा स्त्रीवादी साहित्याचा गाभा आहे. प्रस्थापित जीवन व्यवहार – उदा. सामाजिक संकेत, चाली रीती, धार्मिक सणवार, आर्थिक बाबी इ. कडे पाहण्याचा दृष्टीकोन समुळ बदलून त्या बदलाचा अनुभव साहित्यात अपरिहार्यपणे व्यक्त केले हे स्त्रीवादी साहित्याचे ध्येय आहे.

**मराठीमध्ये स्त्रीसंबंधी स्त्रीवादी साहित्य लेखन :–**

'स्व' च्या शोधासाठी चाललेला 'स्त्री' चा आजचा संघर्ष समजून घेतांना इतिहासात शक्यतो मागे जाऊन शोध घ्यावा लागतो. त्या काळातही हे संघर्ष स्त्री मुक्तीच्या नावाने ओळखले गेले नसतील परंतू स्त्री मुक्तीच्या चळवळीमुळे त्यात निश्चित सापडतील.

मराठीमध्ये सन 1882 साली ताराबाई शिंदे यांच्या 'स्त्री पुरुष तुलना' मधून व्यक्त झाले होते या पुस्तकात स्त्री पुरुषांमधील सारा असमतोल दूर करुन स्त्री जातीला न्याय देण्यासाठी खटपट आहे. यामध्ये आधुनिक क्रांतीदर्शी विचार इतक्या तर्कशुध्द पध्दीने एका स्त्रीने मांडलेले मराठी गद्याने पहिल्यांदाच अनुभवल्याने ताराबाईचा निंबध सर्व सामान्य स्त्रियांच्या वाचनात येणे शक्य नव्हते आपल्याकडे स्त्री–शिक्षणाला 19 व्या शतकातच प्रारंभ झाला तरी अत्यंत अल्पसंख्या सुशिक्षित स्त्री वर्गाच्या पलीकडचा प्रचंड मोठा स्त्रीवर्ग निरक्षरच राहिला. कौटुंबिक व आर्थिक पारतंत्र्य, लैंगिक पातळीवर शोषण यातच हा स्त्रीवर्ग खितपत होता.

20 व्या शतकाच्या तिसऱ्या दशकातही विभावरी शिरुरकरांच्या साहित्यातून स्त्रीवादी जाणिवांचे विशेष प्रकट झालेले दिसतात. 1975 नंतर काही प्रमाणात स्त्रीवादी जाणिवा दिसू लागतात 1975 चे 'युनो' ने जाहीर केलेले महिला वर्ष व नंतरचे आंतरराष्ट्रीय महिला दशक या निमित्ताने येथील स्त्रियांच्या चळवळीतील कार्यकत्यांना जागतीक पातळीवरील स्त्रीवादी विचारसरणी व चळवळी यांचा अत्यंत जवळून परिचय झाला.

आपल्या देशात स्त्रियांच्या अस्मिता जागृती–संबंधी जे संधटीत प्रयत्न झाले, त्यांच्या प्रभावातून स्त्रियांच्या लेखनातून स्त्रीवादी जाणीवा प्रकर्षाने प्रकट होऊ लागल्या. ज्योती

म्हापसेकर यांच्या 'मुलगी झाली हो' मुक्त नाटकांचे असंख्य प्रयोग होऊन स्त्री मुक्ती चळवळीला बळ लाभले. स्त्री प्रश्नांची चर्चा करणारी 'बया', 'बायजा', 'मिळुन सार्‍या जणी', 'स्त्री उवाच' ही नियतकालिके सुरु झाली. यातुनही वाङ्‌मयीन अभिरुचीला नवे परिणाम देण्याचे प्रयत्न होऊ लागले.

पाश्चात्य स्त्रीवादी भूमिका आपल्याशी समान आहे हे लक्षात येऊ लागले. पाश्चात्य स्त्रीवादी भूमिकेशी संवाद साधत येथील स्त्रीवादी जाणिवा वृत्तपत्रीय लेखांमधून, स्त्रीविषयक मासिकामधून, इतरही नियतकालिकांमधून कधी वैचारिक तर कधी साहित्य स्वरुपात प्रकट होऊ लागल्या.

1975 नंतरच्या या काळात स्त्रियांच्या कथांमधून अनेक स्त्रीवादी जाणिवा जागोजाग विखुरलेल्या दिसुन येतात. समकालीन कथालेखिकांत गौरी देशपांडे, सानिया, प्रिया तेंडुलकर, रोहिणी कुलकर्णी, सुनिती आफळे, कमल, देसाई, निर्मला देशपांडे, सरिता पदकी, विजया राजाध्यक्ष, अंबिका सरकार, उर्मिला सिरुर, आशा बगे, पद्मिनी बिनीवाले, उर्मिला पवार, प्रतिमा इंगोले इ. च्या कथांमधून 'स्त्रीकेंदी' संहिता आणि स्त्रीवादी विशेष यांचा विचार अनेक ठिकाणी येतो.

स्त्री मुक्ती चळवळीनंतरच्या पिढीतल्या स्त्रियांच्या कवितांच्या अवलोकनात स्त्रीवादी वैशिष्ट्यांचा प्रकर्षाने प्रत्यय येतो. या काळातील नीरजा, मालिका अमरशेख, रजनी परळकर, प्रभा गणारकर, अनुराधा पाटील, अरुणा ढेरे, प्रज्ञा लोखंडे, आश्विती धोंडगे, अंजली कुलकर्णी यांच्या कवितेत स्त्रीवादी स्त्री विशिष्ट अनुभूतींची अभिव्यक्ती झालेली दिसते.

त्यांच्या कवितांतून या युगात सावध व शहाणी होत चाललेली पुरुषांच्या डावपेचांचा सुगावा लागणारी समाजात सुरक्षीत नसल्याची समाजव्यवस्थने भोगवस्तूच्या रुपात न्याहाळलेले असल्याची जाणिव हाणारी स्त्री प्रकटते.

एकंदरीत स्त्रीवादी जाणीवांसंबंधी विचार करता तळागळातील स्त्रियांनाही आता हळूहळू आपल्या अस्मितेची जाणीव हाऊ लागली असून त्याही आपल्या हक्कासाठी झागडू लागल्या आहेत. या सर्व स्त्री मुक्ती चळवळीचे पडसाद मराठी साहित्यात उमटू लागले असून त्यातूनच स्त्रीवादी साहित्याला बळ प्राप्त होत आहे.

## सन्दर्भ ग्रंथ :–

1. प्रा. नरेंद मारवाडे, आधुनिक मराठी वाङ्मयाची संस्कृतीक पार्श्वभूमी, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती 2005, पृ.क्र. 156–159.
2. संपादक – डॉ. मा. मा. जाधव, 'अक्षरगाथा', त्रैमासिक अंक–4, जाने–मार्च 2015 नांदेड पृ.क्र. 104.
3. डॉ. मंगला वरखेडे, स्त्रियांचे कथालेखन नवी दृष्टी नवी शैली, सांकेत प्रकाशन प्रा. लि, औरंगाबाद. द्वितीय आवृत्ती 2005.